MHKO100015332023

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. २७८/२०२३</u>**

शांताबाई सिदगोंडा पाटील उर्फ मेटवार.
//वि//
बापू मारुती घस्ती वगैरे.

## <u>निशाणी क्र. २४ वर आदेश</u>

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ६, नियम १७ अन्वये दाव्याच्या शिर्षकामध्ये दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, त्यांनी प्रतिवादींविरुध्द सदरचा दावा वाटप व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये प्रतिवादींना समन्स लागू झाले आहे. प्रतिवादी क्र.९ विरुध्द एकतर्फा चा हुकूम करावा म्हणुन वादी यांनी अर्ज दिला होता. तो अर्ज मागील तारखेस मे. न्यायालयाने नामंजूर करुन वादीने दाव्यात योग्य ती दुरुस्ती करावी असा हूकूम केलेला आहे. सबब, वादी यांनी दाव्याच्या शिर्षकामध्ये प्रतिवादी क्र.९ च्या नांवापूढे "मतीमंद करीता अ.पा.क. जनक आई प्रतिवादी क्र.७ रंजना महादेव घस्ती, रा. मुगळी, ता. गडहिंग्लज" अशी दुरुस्ती करेणेबाबत परवानगी मागितली आणि अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास <u>निशाणी क्र.२४</u> येथे म्हणणे दिले व असे कथन केले की, अर्जातील मजकुर खोटा व चुकीचा असुन तो त्यांना मान्य नाही. वादी यांना सुचविलेल्या दुरुस्तीबाबत दावा दाखल करणेपूर्वी माहिती होती. तरीदेखील वादी यांनी दिर्घकालानंतर दुरुस्ती मागितलेली आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार आहे. सदर अर्जास मुदतीच्या कायदयाची बाधा येते. वादीने दाव्याच्या चौकशीचे काम दिर्घकाळ प्रलंबीत ठेवण्याच्या हेतुने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादीने सरसनिरस मानाने वाटपासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादीच्या कथनावरुन, प्रतिवादी क्र.९ विरुध्द एकतर्फा चा हुकूम करावा म्हणुन वादी यांनी अर्ज दिल्यानंतर सदरचा अर्ज मागील तारखेस न्यायालयाने नामंजूर करुन वादीने दाव्यात योग्य ती दुरुस्ती करावी असा हूकूम केलेला आहे. सबब, वादी यांनी दाव्याच्या शिर्षकामध्ये प्रतिवादी क्र.९ च्या नांवापूढे "मतीमंद करीता अ.पा.क. जनक आई प्रतिवादी

क्र.७ रंजना महादेव घस्ती, रा. मुगळी, ता. गडहिंग्लज" अशी दुरुस्ती करेणेबाबत परवानगी मागितली आहे. त्याप्रमाणे, सदरची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. दाव्याचे स्वरुप पाहता वादीने मागणी केलेप्रमाणे दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. त्यामुळे, सदर दुरुस्ती केलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याऊलट, दावा हा गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, मुळ दाव्यात कोणतीही दुरुस्ती नसल्याने व केवळ दाव्याच्या शिर्षकामध्ये दुरुस्ती असल्यामुळे मुळ दाव्यात कोणतेही बदल होत नसल्याने दाव्याचे स्वरुप बदलणारे नाही. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: <u>आदेश</u> :-**

०१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. वादी यांनी अर्जात सुचविलेली दुरुस्ती १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये करुन त्याअनुषंगाने दुरुस्त दाव्याच्या प्रती न्यायालयात सादर कराव्यात.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2026.03.16 16:48:18 +0530

**( एस. डी. मेहता )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १६/०३/२०२६.